कल्याण 'अे' सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
कल्याण 'बी' सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता:-प्लॉट नं.३२१/अे/१,महात्मा फुले पेठ,पुणे. ४११ ०४२.
नोंदणी क्र.:-पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/१९६६५/२०१९, दि.१०/०७/२०१९
नोंदणी क्र.:-पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/१९६६६/२०१९, दि.१०/०७/२०१९

---

दिनांक:-२२/०४/२०२३

# पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

कल्याण 'अे' आणि कल्याण 'बी' सहकारी गृहरचना संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १८.०४.२०२३ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता कस्तुरबा महिला मंडळ हॉल आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस कल्याण 'अे' चे २३ सभासद आणि कल्याण 'बी' चे १९ उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री.अमृतलाल भंडारी, जयंतीलाल जैन आणि संस्थेचे प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि विजय ओसवाल हे उपस्थित होते. अध्यक्षांनी उपस्थित सभासदांचे स्वागत करून सभेला सुरूवात करण्यात आली.

विषय क्रमांक ०१ :- संस्थेच्या पुर्नबांधणी प्रकल्पाबाबत प्राथमिक निर्णय घेणेबाबत.
ठराव क्रमांक ०१ :- संस्थेच्या अध्यक्षांनी आजच्या सभेसाठी पुर्नविकसनाबाबत सभासदांना मार्गदर्शन करण्यास आमंत्रित केलेले श्री.संजय सुर्यवंशी आणि विजय ओसवाल यांची सभासदांना ओळख करून दिली. व त्यांना पुर्नविकसना बाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

श्री.संजय सुर्यवंशी यांनी प्रथम सभासदांना सहकार खात्याच्या ४ जुलै २०१९ च्या परिपत्रकाबाबत विस्तृत माहिती दिली. सदर प्रक्रिया पार पाडत असताना प्रत्येक टप्प्याबाबत विस्तृत विवेचन त्यांनी सभेपुढे केले.त्यावर सभासदांनी वेगवेगळया शंका विचारल्या एकूण सर्व चर्चा सकारात्मक पध्दतीने झाली तसेच सभासदांकडून मांडण्यात आलेल्या शंकांना योग्य पध्दतीने सकारात्मक दृष्टिकोनाने शंकासमाधान करण्यात आले. व याचा विचार करताना सभासदांचा पुर्नबांधणी करण्यासाठी कौल असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार उपस्थित सभासदांची

पुर्नबांधणी प्रस्तावास प्राथमिक मंजुरी असल्याचे सांगण्यात आले. अशा रितीने पुर्नबांधणी प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात आला.

सुचक:-श्री. प्रमोद जैन अनुमोदक :-श्री.चेतन ओसवाल

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०२ :- सदर पुर्नबांधणी प्रस्तावाच्या कार्यवाहीबाबत पुर्नविकास समिती नेमणे व त्यांना अधिकार देणेबाबत.

ठराव क्रमांक ०२ :-संस्था इमारत पुर्नबांधणी प्रस्तवाच्या कार्यवाहीबाबत विवेचन श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे केले त्यानुसार सहकार खात्याने आत्ता ४ जुलै २०१९ रोजी संस्था इमारत पुर्नविकास करणेसाठी विशेष परिपत्रक काढण्यात आले. त्यानुसार त्यातील आवश्यक बार्बीची पुर्तता करण्यासाठी, सदर बाबत आवश्यक माहिती गोळा करणे, वेगवेगळया एजन्सीची माहिती घेणे, त्यांच्याकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रक तसेच निविदा मागविणे, या सर्व गोष्टीवरील उल्लेख केलेल्या परिपत्रकातील आवश्यक बार्बीची पुर्तता करणेकामी कार्यवाही करणेबाबत संस्थेची पुर्नविकास समिती व व्यवस्थापक समितीस अधिकार देण्याबाबत सदर ठरावाद्वारे सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सदर समिती पुढीलप्रमाणे :-

इमारत पुर्नविकास समिती सभासदांची नावे पुढीलप्रमाणे:-

| | |
|---|---|
| १. श्री.अमृतलाल भंडारी (कल्याण सोसायटी 'अे') | अध्यक्ष |
| २.श्री.संदिप राका | सचिव |
| ३.श्री.जयंतीलाल जैन (कल्याण सोसायटी 'बी') | अध्यक्ष |
| ४.श्री.अमित भंडारी | पुनर्विकास समिती सदस्य |
| ५.श्री.मयुर | पुनर्विकास समिती सदस्य |
| ६.श्री.रमनभाई | पुनर्विकास समिती सदस्य |
| ७.श्री. निर्मल | पुनर्विकास समिती सदस्य |
| ८.श्री.श्रीपाल | पुनर्विकास समिती सदस्य |
| ९. श्री. छगनभाई | पुनर्विकास समिती सदस्य |
| १०.श्री.सुभाष | पुनर्विकास समिती सदस्य |
| ११.श्री.मनिष | पुनर्विकास समिती सदस्य |
| १२.श्री.सुनिल परमार | पुनर्विकास समिती सदस्य |

१३.श्री.रांका विमल पुनर्विकास समिती सदस्य
१४.श्री.शहा रितेष पुनर्विकास समिती सदस्य
१५.श्री.चेतन पुनर्विकास समिती सदस्य
१६.श्री.अजित पुनर्विकास समिती सदस्य
१७.श्री.हरिष पुनर्विकास समिती सदस्य

सुचक :-श्री.रीतेष शहा अनुमोदक :-श्री. हेमंत जैन

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०३ :- सदर प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी प्रकल्प सल्लागार व निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक ०३ :- सदर विषयाबाबत सहकार खात्याच्या परिपत्रकानुसार आवश्यकतेनुसार वेगवेगळया एजन्सीज् नेमणे, आर्किटेक्ट व वकिल प्रोफेशनल सल्ला घेणे, आवश्यक ती कागदपत्रे तयार करून घेणे, आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करणे यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून घेणे आवश्यक आहे. त्याचे महत्व तसेच त्याबाबतच्या आर्थिक बाबी या सर्व गोष्टी मा.पदाधिकाऱ्यांकडून सभासदांपुढे मांडण्यात आल्या सभासदांकडून याबाबत वेगवेगळी माहिती विचारण्यात आली. तसेच काही शंका उपस्थित करण्यात आल्या. परंतु त्या सर्व शंकांचे योग्य पध्दतीने व आवश्यक माहिती पुरवून समाधान करण्यात आले. त्यानुसार प्रकल्प सल्लागार एजन्सी नेमणेबाबत सर्व सभासदांचे एकमत झाले.

सुचक:-श्री.महेंद्र राठोड अनुमोदक:-श्री.ललित ओसवाल

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०४ :- संस्थेच्या इमारत पुर्नविकाससंबंधीच्या कार्यक्रमाची रूपरेषा सादर करणे.

ठराव क्रमांक ०४ :- श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे इमारत पुर्नविकाससंबंधिच्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. त्यामध्ये पहिल्या दोन टप्प्यांच्या 1.Feasibility Report कार्यवाहीच्या स्वरूपाबाबत माहिती दिली व त्याबाबतच्या कार्यवाहीचे अधिकार पुनर्विकास समिती व प्रकल्प सल्लागार यांना देण्यात आले. सदर प्रोसेसची कार्यवाही पुर्ण करून साधारण दोन ते तीन महिन्यांत विशेष सर्वसाधारण सभा घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल.

सुचक:- श्री.शांतिलाल मुथा अनुमोदक :-श्री.निलेश भंडारी

ठराव सर्वसंमत

यानंतर पुनर्विकास समितीच्या वतीने उपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांचे, प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि श्री.विजय ओसवाल यांचे संस्थेच्या वतीने आभार मानले आणि आजची सभा संपल्याचे जाहीर केले.